# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २९/११/२०१८

## जिल्हा परिषद पुणे येथील कनिष्ठ लिपीकाने दोन हजार रूपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केलेबाबत..

---

यातील तक्रारदार हे जिल्हा परिषद पुणे कार्यालयात नोकरीस आहेत. त्यांच्या बदली संदर्भाने केलेला अर्जावरून तक्रारदार यांच्या बदलीची फाईल जिल्हा परिषद पुणे येथील उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यासाठी जिल्हा परिषद पुणे येथील कनिष्ठ लिपीक सचिन साकुरे कनिष्ठ लिपीक, सामान्य प्रशासन विभाग याने तक्रारदार यांचेकडे २,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे विभाग येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २९/०५/२०१८ रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक सचिन साकुरे, कनिष्ठ लिपिक याने तक्रारदार यांच्या बदलीची फाईल उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यासाठी २,०००/- रू. लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आज रोजी लोकसेवक सचिन महादेव साकुरे, वय ४१, कनिष्ठ लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे, याचेविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलमान्वये बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा रजिस्टर नंबर ३५८/२०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.